स्थायी समिती

दाखल विषय – दि. ६/१०/२०२०

विषय क्रमांक :– ५७७ त्वर्य

पुणे मनपा कार्यक्षेत्राअंतर्गत पुणे शहरातील कोविडबाधित रुग्णांवर उपचार करणेसाठी पुणे शहरातील एकूण ११ रुग्णालयांशी केलेल्या कराराचा कालावधी संपूष्टात येत असल्याने सदर कराराच्या कालावधीस मुदतवाढ देणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३१९ दि.५/१०/२०२० चे पत्र.

१) सद्यस्थितीत पुणे मनपाने शहरातील एकूण ११ खाजगी रुग्णालयांसोबत केलेल्या करारांपैकी खालील नमूद केलेल्या रुग्णालयांचे करारास तीन महिने मुदतवाढ देणेस

| अ.क्र | हॉस्पीटलचे नाव | उपचारांसाठी उपलब्ध केलेली बेडसंख्या |
|---|---|---|
| १ | सिंबॉयसीस युनिवर्सिटी हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, लवळे, ता. मुळशी, जि. पुणे | • ९० ऑक्सीजन बेड<br>• ३० आयसीयू बेड |
| २ | भारती हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, पुणे सातारा रोड, धनकवडी, ता. हवेली, जि. पुणे | • ११० ऑक्सिजन बेड,<br>• ४० आयसीयू बेड |
| ३ | लता मंगेशकर मेडिकल फौंडेशन चे दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर, पुणे | • १२५ ऑक्सिजन बेड<br>• १५ आयसीयू बेड |
| ४ | सरदार वल्लभभाई पटेल कँटोन्टमेंट जनरल हॉस्पीटल, गोळीबार मैदान, शंकरशेठ रोड, कॅम्प, पुणे | • ७० ऑक्सिजन बेड<br>• १५ आयसीयु बेड ऑक्सिजनसहीत |

२) तसेच ऑक्सीजन बेडची जास्त प्रमाणात आवश्यकता भासल्यास, उर्वरीत इतर ८ खाजगी हॉस्पीटल्सची तीन महिने अखेरपर्यंत मुदतवाढ करणेस

विषय क्रमांक :– ५७८ त्वर्य

पुणे शहरातील मा.मुख्य अभियंता (पथ) अंतर्गत भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील काँक्रीट व डांबरी रस्त्याचे रोड मेन्टेनस व्हॅनद्वारे वार्षिक देखभाल दुरुस्ती विषयक कामे व तदनुषंगिक कामे (दिवस पाळी) करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४३,७९,६०३=५० पेक्षा २३.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,७२,२९४=७० पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये ५,२५,५५२=४२ पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३२० दि.५/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५७९ त्वर्य

शिवाजीनगर घोले रोड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत काँक्रीट व डांबरी रस्त्याचे रोड मेन्टेनस व्हॅनद्वारे वार्षिक देखभाल दुरुस्ती विषयक कामे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,१४,९७३/– पेक्षा २२.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,५३,६७८=९४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये १०,६९,७९६=७६ पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३२१ दि.५/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५८० त्वर्य

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आर.एम.व्ही.व्हॅन ने रस्त्याची दुरुस्ती करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दीविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८९,१४,९७३/– पेक्षा २९.६५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६२,७१,६८३=५१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये १०,६९,७९६=७६ पर्यंत अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३२२ दि.५/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५८१ त्वर्य

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत एम.एन.जी.एल./महावितरण व इतर विभाग मार्फत खोदाई करण्यात आलेल्या रस्त्यांचे पृष्ठभागावर रिईनस्टेटमेंट व इतर तदनुषंगिक विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८८,८९,४९१/– पेक्षा ३०.७९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,५२,४१६=७२ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रुपये १०,६६,७३८=९२ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ७,०६७/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३६,४८८/– पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३२३ दि.५/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५८२ त्वर्य

पुणे शहरातील मा.मुख्य अभियंता (पथ) अंतर्गत कसबा–विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय क्षेत्रातील काँक्रीट व डांबरी रस्त्याचे रोड मेन्टेनन्स व्हॅनद्वारे वार्षिक देखभाल दुरुस्ती विषयक कामे व तदनुषंगिक कामे (दिवस–पाळी) करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रमेश मनोहर गुंड यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४३,०७,११५=५० पेक्षा २३.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,७७,७१४=९० पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,१६,८५३=८६ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/३२४ दि.५/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५८३ त्वर्य

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणे करता **पुणे महानगरपालिका व पुणे महागनरपालिका–मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट** यांचे मध्ये करारनामे (एम.ओ.यु.) करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३२५ दि.६/१०/२०२० चे पत्र.

१. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण ३ करारनामे (एम.ओ.यु) करणेस,

२.सर्व करारनामे (एम.ओ.यु)वर पुणे महानगरपालिकेच्या वतीने स्वाक्षरी करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस,

३.या बाबत मा.मुख्य सभेची मान्यता प्राप्त होईल या भरवश्यावर कार्यवाही सुरु करणेस,

विषय क्रमांक :– ५८४ त्वर्य

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत यंत्राच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन व चेंबरची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अंकिता इंजिनिअर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,२३,५७२/– पेक्षा १४.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४५,३०,३५९=७७ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/३२६ दि.६/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५८५ त्वर्य

कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या उरुळी देवाची व शेवाळवाडी येथे दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (२०२०–२१) (भाग २) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार एन.वाय.शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प. र.रु. ९९,९६,४२५/– पेक्षा १५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८४,९६,९६१=२५ रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/३२७ दि.६/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५८६ त्वर्य

सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत पडिक हद्दीतील झाडणकाम व स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे. (टेंडर क्र.२३–२०१९) या कामाचे सर्वात कमी दराचे ठेकेदार **मे.राजवीर एंटरप्रायजेस** यांचेकडून त्याचे टेंडर(**९.९९% जादा** ) दराने रक्कम रूपये **३,१६,३०,२०२=८८ (र.रू.तीन कोटी सोळा लाख तीस हजार दोनशे दोन रूपये आणि अठ्ठयाऐंशी पैसे फक्त)** पर्यंत ''दि.०१ जुन २०२० पासुन नोव्हेंबर २०२० अखेर'' किंवा दिवाणी दावा क्र.६९४/२०२० चा मे.कोर्टाने दि.४/८/२०२० व २५/८/२०२० रोजी **STATUS -QUO** (जैसे थे स्थिती) ठेवणेबाबतचा आदेशास केलेले जिल्हा न्यायालयात अपिल **MCA No.111/2020** चा निर्णय यामधील जी बाब आधि होईल तिथपर्यंत कालावधीसाठी मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने

काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/३२९ दि.६/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ५८७ त्वर्य**

कोव्हिड १९ रूग्णांकरीता COVID - 19 Ag detection Kit, खरेदी करणेसाठी दर कोटेशन मागविणेकामी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मागविणेस व या कामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस व पुणे मनपाच्या वेबसाईटवर प्रसिध्दि दिली असता आलेल्या तीन प्रस्तावधारकांपैकी प्रस्तावधारक SD Biosensor Healthcare Private Limited यांनी सर्वात कमी दर दिला असल्याने त्यांचेकडून COVID - 19 Ag detection Kit ५०,००० किट x प्रति किट रक्कम रूपये ४१४=४० जीएसटी करासह रक्कम रूपये २,०७,२०,०००/– (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी सात लाख वीस हजार फक्त ) पर्यंत खरेदी करणेस, खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३३० दि.६/१०/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**विषय क्रमांक :– ५८८ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या ५० एम.एल.डी. एरंडवणे व ३२ एम.एल.डी. विठ्ठलवाडी मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथे सेकंडरी सेटलिंग टँक मध्ये टयुब सेटलर मिडीया पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री स्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु. ९४,८२,०००/– पेक्षा १३.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८२,२०,८९४/– वस्तु व सेवा करासह पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/३३२ दि.६/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ५८९ त्वर्य**

सन २०१९–२० व २०२०–२१ सालासाठी आरोग्य खाते किटक प्रतिबंधक विभागास पुणे महानगरपालिका हद्दीत शहरात इंडोअर व्हेक्टर कंट्रोल प्रोग्राम राबविणे व तदनुषंगिक कामे करणे व लेबर पुरविणे या कामामधून "सन २०२०–२१ अंतर्गत अत्यावश्यक महसूली खर्च कामासाठी खर्च RE 17 F 257 COVID - 19" या अर्थशिर्षकामधून टेंडर रकमेच्या ५०% म्हणजे र.रु. ३,२०,००,०००/– पर्यंत मे.श्री एन्टरप्रायजेस व मे.दिशा एजन्सी या दोन्ही ठेकेदाराकडून सम प्रमाणात काम करुन घेणेस, वाढीव करारनामा करणेस, त्यापोटीचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३३४ दि.६/१०/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ५९० त्वर्य**

नगरसचिव कार्यालयाकडील सेवक श्री.मिलिंद नारायण वाघमारे, हुद्दा समिती लेखनिक यांनी मनपा सेवेतुन ऐच्छिक सेवानिवृत्ती मिळावी म्हणून दिनांक २९/९/२०२० रोजी विनंती अर्ज केलेला असून सदर सेवकाचा ऐच्छिक सेवानिवृत्तीची विनंती मनपा सेवाविनियम ६६(जे) मधील २० वर्षे सेवा पुर्णतेची / वयाबाबतची, तरतुद विचारात घेऊन श्री.मिलिंद नारायण वाघमारे, हुद्दा समिती लेखनिक यांना त्यांचे स्वेच्छेनुसार व त्यांचे मागणीनुसार दिनांक ३१/१/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेनंतर मनपा सेवेतुन (ऐच्छक सेवानिवृत्ती) सेवामुक्त करण्यास व सेवानिवृत्तीमुळे नियमाप्रमाणे पेन्शन,ग्रॅच्यूएटी इ.मिळणारे सर्व फायदे त्यांना अदा करणेस तसेच त्यांचेकडुन मनपाची येणे बाकी असल्यास वा निघाल्यास ती विनाविलंब वसुल करण्यास मान्यता देण्याबाबत मा.प्रभारी नगरसचिव यांचे जा.क्र. नस/१५९८ दि.६/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५९१ त्वर्य
मा.राजेंद्र शिळीमकर व मा.सुनिल कांबळे, आमदार यांचे दि.६/१०/२०२० चे पत्र.

श्री.ललित देशमुख ॲन्ड असोसिएटस ६०३, आयकॉनिक लिव्हींग, पॅन कार्ड क्लब रोड, बाणेर पुणे–४११०४५ ही फर्म गेली ४० वर्षापासून आर्किटेक्ट कन्सल्टंट म्हणुन चांगल्या रितीने काम करीत आहे.

तरी त्यांच्या इतक्या वर्षाच्या कामाचा व अनुभवाचा विचार करता त्यांना पुणे महानगरपालिकेच्या पथ,भवन तसेच उद्यान विभागामार्फत व क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या निरनिराळया पुलांच्या व रस्त्यांच्या कामा करिता सल्लागार यांचे यादीत तज्ञ सल्लागारांच्या पॅनेल वर्ग ( I ) (प्रोजेक्ट रक्कम रुपये ०.० ते ५.०० कोटी पर्यंत) व पॅनल वर्ग ( II) (प्रोजेक्ट रक्कम रुपये ५.०० ते २०.०० कोटी पर्यंत) वर नियुक्ती करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ५९२ त्वर्य
मा.प्रकाश ढोरे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.६/१०/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २४५४ दि. १७/३/२०२० (श्री.शिवस्वरा कन्सल्टंट, ३०३ कोंढवा खुर्द, स.नं. ११७/८, सिल्व्हर इस्टेट, एन.आय.बी.एम. रोड, पुणे ४८) ही फर्म गेले अनेक वर्षापासून आर्किटेक्ट कन्स्ल्टंट म्हणून चांगल्या रितीने काम करीत आहे.

त्यांच्या इतक्या वर्षाच्या कामाचा व अनुभवाचा विचार करता त्यांना पुणे मनपा पथ तसेच भवन व उद्यान विभागामार्फत व क्षेत्रिय कार्यालयामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता सल्लागार यांचे यादीत तज्ञ सल्लागारांच्या पॅनेल वर्ग (I)(प्रोजेक्ट र.रुपये ०.० ते ५.०० कोटीपर्यंत) समाविष्ट करणेबाबतचा फेरविचार करुन त्यामध्ये पॅनेल वर्ग (II)(प्रोजेक्ट र.रुपये ५.०० ते २०.०० कोटीपर्यंत) अशी दुरुस्ती करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ५९३ त्वर्य
मा.राजेंद्र शिळीमकर व मा.बाळा ओसवाल यांचे दि.६/१०/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या लाभांसाठी संबंधित कार्यालयात ये जा करण्यासाठी निवृत्ती वेतनाबाबत ची कार्यवाही विहित मुदतीत व्हावी, रुग्णालय, बँक, ज्येष्ठ नागरिक म्हणून रेल्वे इत्यादी ठिकाणी उपयोग करण्यासाठी, राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांना ओळखपत्र देण्यात येते.

त्याचप्रमाणे पुणे महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना शासन निर्णय संकीर्ण 2016/ प्र. क्र. 183/ 18( र. व. का.) महाराष्ट्र शासन, दिनांक 23 जून 2017 च्या परिपत्रकानुसार सेवानिवृत्त सेवकांना पेन्शन विभागामार्फत ओळख पत्र देण्यास मान्यता देण्यात यावी.

**सोबत- शासन निर्णय**

विषय क्रमांक :– ५९४ त्वर्य

कोरोना प्रतिबंधक उपाय योजने अंतर्गत श्री शिवा छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी कोविड केअर सेंटर, पुणे महानगरपालिकेचे कोविड सेंटर साठी महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम क्र.६७ (३) क अन्यवे कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने करण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा इमारत देखभाल दुरुस्ती व संरक्षक कुंपण या कामासाठी कोथरुड–बावधन क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येत असलेल्या कामासाठी देयक अदा करणेसाठी मे.सागर सोमनाथ यादव या संस्थेला र.रु. ४६,५५,६७६=७२ इतक्या रकमेपर्यंत विना करार व अनामत रक्कम भरुन न घेता देयके अदा करण्यात येणार आहे तसेच सदरचे देयक सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक कोविड १९ विषाणूमुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करणे, महसुली कामांसाठी RE 17F 257, COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च या अर्थशिर्षकातून अदा करण्यात येणार आहे.

सदरची बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/३१५ दि.५/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५९५ त्वर्य

प्रभाग क्र. ३८ मधील चैत्रबन झोपडपट्टीमधील सार्वजनिक शौचालयाचे दैनंदिन साफसफाईचे काम अत्यावश्यक म्हणून मे.शारदा सर्व्हिसेस यांचेकडून करुन घेणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/३१६ दि.५/१०/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा–येवलेवाडी अंतर्गत कोविड–१९ अंतर्गत प्रभाग क्र. ३८ मधील चैत्रबन झोपडपट्टीमधील सार्वजनिक शौचालयाचे दैनंदिन साफसफाई करणेबाबत

सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी – RE17F 257

Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२) मे.शारदा सर्व्हिसेस यांचेकडून दि.२६/६/२०२० पासून काम करुन घेणेस पश्चात मान्यता व त्यांचेशी करारनामा करुन झालेल्या कामाचे बिल अदा करणेस

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार सदरचे काम संपेपर्यंत करणेस

विषय क्रमांक :– ५९६ त्वर्य

कोविड १९ संसर्गाच्या पार्श्वभुमीवर पुणे शहर पोलिस विभागामार्फत मास्क सक्तीच्या दंडात्मक कारवाई करुन १००% महसूलापैकी ५०% महसूल पुणे महानगरपालिकेस व ५०% महसूल पुणे शहर पोलिस यांना वर्ग करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/३३५ दि.६/१०/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ५९७ त्वर्य

मा.पृथ्वीराज सुतार यांचे दि.५/१०/२०२० चे पत्र.

कोरोनाच्या पार्श्वभुमीवर कोरोनाच्या रूग्णांना रेमेडिसीवर इंजेक्शन उपयुक्त ठरत आहे, असे सध्याच्या कोरोनाच्या रूग्णांच्या बरे होण्याच्या संख्येवरून लक्षात येत आहे. हे इंजेक्शन पैशा अभावी सामान्य नागरिक घेऊ शकत नाहीत, त्यामुळे पुणे मनपा तर्फे खरेदी करून शहरातील कोरोनाच्या आवश्यक असेल त्या रूग्णांना मोफत रेमेडिसीवरचे इंजेक्शन देण्यात यावे.

विषय क्रमांक :– ५९८ त्वर्य

मा.प्रकाश ढोरे व मा.अशोक कांबळे यांचे दि.६/१०/२०२० चे पत्र.

कोविड–१९ विषाणूच्या प्रादुर्भाव – कोविड केअर सेंटर आणि संस्थागत विलगीकरण कक्षामधील नागरिक (पेशंट) यांच्यासाठी शिजवलेले अन्न तयार करणे, वाटप करणेकामी कम्युनिटी किचन सुरु करणे (बी–२ पध्दतीने) अल्प मुदतीची (३ दिवसांची) निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या चार निविदांपैकी सर्वात कमी दराचे ठेकेदार जननी महिला मंडळ यांचेकडून र.रुपये १८५/– या दराने २००० नागरिकांना प्रतिदिनप्रमाणे तीन महिने करिता एकूण र.रु.३,३३,००,०००/– नुसार काम करुन घेणेस अथवा आवश्यकतेनुसार तसेच सदर काम अत्यावश्यक असल्याने कोविड केअर सेंटर आणि संस्थागत विलगीकरण कक्षामध्ये देण्यात येत असलेले शिजवलेले अन्न पुरविणाऱ्या संस्थाकडून सदर ठराव मान्य झाल्याच्या दिनांकापासून र.रु.१८५/– प्रमाणे काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस तसेच सदरच्या र.रु. १८५/– च्या रक्कम रुपये पेक्षा जर कोणी ठेकेदार कमी दरात करावयास आल्यास त्याला मान्यता देण्याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र. १७३ दि.२/६/२०२० ने मान्यता देण्यात आलेली आहे. परंतू सदर ठरावात जी.एस.टी. व इतर कर धरण्यात आलेला नाही.
त्यामुळे सदर ठरावात र.रु. १८५/– + जी.एस.टी. व इतर कर या प्रमाणे काम करुन घेणेस मान्यता देण्यात यावी.

**शिवाजी दौंडकर**
**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**